Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

**January-2023**

(CCCLXXXVI ) 386 (B)

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr. Vilas Aghav**
Officiating Principal
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386 B
ISSN : 2278-9308
January, 2023

# INDEX-B



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | संघराज्य व्यवस्थेतील आव्हाने आणि पुढची दिशा | प्रा. सुनील लक्ष्मंण नेवकर | 1 |
| 2 | केंद्र राज्य वित्तीय संबंधामध्ये वित्त आयोगाची भुमिका | प्रा. डॉ. लोडे परमेश्वर लिंबाजी | 6 |
| 3 | स्वातंत्र्योत्तर स्थानिक स्वराज्य संस्थातील महिलांचा राजकीय सहभाग | डॉ.साहेब राठोड , गणेश मारोती कचरे | 9 |
| 4 | न्यायालयीन संक्रियता उदय आणि विकास: एक अभ्यास | के. एम. गोलेकर | 12 |
| 5 | भारतीय महिलांच्या समस्या आणि त्यांचे मानवी हक्क | प्रा. सचिन जयस्वाल | 18 |
| 6 | भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्य यांचे भारतीय नागरिकांच्या जीवनातील महत्व: एक अभ्यास | किसन लक्ष्मण कुमरे | 21 |
| 7 | केंद्र- राज्य कायदेविषयक संबंधांचा अभ्यास | प्रा. डॉ. स्वामी विरभद्र गुरुप्पा | 25 |
| 8 | भारताच्या संविधानाची उपलब्धी | प्रा.डॉ. विठ्ठल दहिफळे | 30 |
| 9 | भारतीय राजकीय व्यवस्थेत राज्यपालाची भूमिका | श्री . संजय ना. बागल | 40 |
| 10 | भारतीय राज्यघटनेची भूमिका अध्ययन | साहेब नरवाडे ,डॉ.संजय गायकवाड | 46 |
| 11 | भारताच्या प्रतिनिधिक संसदीय लोकशाहीमधे निवडनुक आयोगाचे बदलते स्वरुप व भूमिका | प्रा. संदीप भीमराव कु-हाडे | 50 |
| 12 | सद्यस्थितीतील भारतीय स्त्रियांचे स्वातंत्र्य | प्रा. डॉ. शैलजा बरुरे | 53 |
| 13 | भारताच्या राज्यघटनेची मुलतत्वे: एक अभ्यास | प्रा.डॉ.सतिष.एम.कटके | 58 |
| 14 | लोकशाही, निवडणूक आणि मतदार.... | प्रा.डॉ.प्रभाकर गणपतराव जाधव | 62 |
| 15 | लोकप्रशासनातील अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी सेवासंहिता व विविध कायदे | प्रो..डॉ.बी.आर.कतुरवार | 67 |
| 16 | भारतीय लोकशाही समोरील सामाजिक व सांस्कृतिक समस्या | प्रा.डी.आर.चव्हाण | 71 |
| 17 | प्रादेशिक असमतोल विकास भारतीय लोकशाही समोरील आव्हान | प्रा.डॉ. जी.डी. घोडे | 77 |
| 18 | विदेश नीति पर बी. आर. अम्बेडकर के विचार | आशुतोष कुमार | 80 |
| 19 | भारतीय शासन व्यवस्थेवरील संवैधानिक नियंत्रण | प्रा.डॉ. देविदास ग्यानुजी नरवाडे | 84 |





Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- B
ISSN : 2278-9308
January, 2023

# न्यायालयीन सक्रियता उदय आणि विकास: एक अभ्यास

के. एम. गोलेकर
सहाय्यक प्राध्यापक कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि. परभणी

Warpudkar (ACS) College, Sonpeth Late Ramesh Dist. Parbhani

प्रास्ताविक

भारतीय राज्यघटनेत, शासन व्यवस्थेत अनेक वेगवेगळ्या संस्था आहेत या संस्थांपैकी कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या महत्त्वपूर्ण संस्था आहेत. प्रत्येक संस्था काळाच्या ओघात स्वतःला अद्यावत करण्याचा प्रयत्न करत असते. यासाठी वेगवेगळ्या माध्यमांचा, घटकांचा आधार घेतला जातो. भारताची न्यायव्यवस्था याला काही अपवाद नाही. भारतीय न्यायव्यवस्थेची पार्श्वभूमी आपल्याला ब्रिटिश कालखंडापासून आढळते. तेव्हापासून तिला एक वेगळी परंपरा प्राप्त झालेली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय न्यायव्यवस्थेने स्वतःमध्ये अनेक अमुलाग्र बदल करून घेतले आहेत. काळाच्या ओघात अनेक संज्ञांचा आणि संकल्पनांचा विकास करून त्या स्वीकारून न्यायव्यवस्थेला अद्यावत करण्याचे काम केले आहे. यापैकी सर्वात महत्त्वाच्या संज्ञा किंवा संकल्पना म्हणजे न्यायालयीन पुनर्विलोकन, न्यायालयीन स्वातंत्र्य, न्यायालयीन सक्रियता, कॉलेजियम या संकल्पना होत. यापैकी सर्वात महत्त्वाची आणि चर्चेची विषयी बनलेली संकल्पना म्हणजे न्यायालयीन सक्रियता होय.

उद्दिष्टे..

1. न्यायालयीन सक्रियता म्हणजे काय हे सांगून तिच्या विकासाचे विविध टप्पे स्पष्ट करता येतील.
2. न्यायालयीन सक्रियता कोणत्या साधनांच्या साह्याने व कोणकोणत्या क्षेत्रात विकसित झाली याचा परिचय करून घेता येईल.
3. न्यायालयीन सक्रियतेमध्ये कोणत्या न्यायाधीशांचे योगदान आहे हे नोंदविता येईल.
4. न्यायालयीन सक्रियतेच्या उदयाची कारणे व परिणाम नोंदविता येतील.

भारतीय न्यायव्यवस्थेत न्यायालयीन सक्रियता अगदी सुरुवातीपासूनच पहावयास मिळत असली तरी ती न्यायालयीन सक्रियता या नावाने ओळखली न जाता न्यायालयीन पुनर्विलोकन या नावाने ओळखली जात होती. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ यांची एखादी कृती किंवा त्यांचे एखादे कर्तव्य व्यवस्थित पार पाडले जात नसल्यास, त्याची दखल घेऊन न्यायालय जेव्हा आदेश केव्हा निर्देश देते तेव्हा त्याला न्यायालयीन सक्रियता म्हटले जाते. साधारणपणे शासनाच्या निष्क्रिय धोरणातून आणि न्यायालयाच्या इच्छाशक्तीतून न्यायालय सक्रियतेचा उगम झालेला दिसतो. आज ही सक्रियता एवढी व्यापक बनली आहे की, आज असे कोणतेही क्षेत्र पाहावयास मिळत नाही की, त्यात न्यायालयाने हस्तक्षेप केलेला नाही. शासनाने केवळ राजकीय हेतूने घेतलेले निर्णय अनेक वेळा न्यायप्रविष्ट होऊन बसले आहेत. तर कधी कधी न्यायालयाने आपल्या आवडीचे विषय आहेत म्हणून त्यात हस्तक्षेप केलेला आढळतो. केवळ वृत्तपत्रीय बातम्यातून देखील न्यायालयाने आपली न्यायालयीन सक्रियता दाखवलेली आढळते. न्यायालयीन सक्रियतेचा प्रमुख स्रोत हल्ली जनहित याचिका हा मानला जातो. सन 1952 मध्ये न्यायालयीन सक्रियतेचा उल्लेख करण्यास प्रारंभ झाला. मद्रास विरुद्ध बी. जी. राव या खटल्यात मुख्य न्यायमूर्ती पतंजली शास्त्री यांनी न्यायपालिका मूलभूत अधिकारांचे संरक्षक आहे असे स्पष्ट केले. पुढे याच न्यायालयीन सक्रियतेला गती प्राप्त करून देण्याचे कार्य न्यायमूर्ती पी एन भगवती यांनी 1974 मध्ये रोयप्पा विरुद्ध तामिळनाडू राज्य या खटल्यात केले.



Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516

न्यायमूर्ती पी एन भगवती यांच्यानंतर न्यायालयीन सक्रेतेला महत्त्व प्राप्त करून देण्याचे खरे श्रेय न्यायमूर्ती श्री.कृष्ण अय्यर, कुलदीप सिंह आणि श्री जे एस वर्मा यांना जाते. अल्पमतातील सरकारे, प्रशासनातील वाढता हस्तक्षेप, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ यांची त्यांच्या कार्याप्रती असणारी उदासीनता, पक्षीय दृष्टिकोनातून घेतले जाणारे निर्णय, राजकीय किंवा प्रशासकीय अज्ञान, लोकशाही मूल्यांची तोडफोड प्रशासकीय अधिकारी व राजकीय नेत्यांची सांगड, जनहित याचिका अशी विविध कारणे न्यायालयीन सक्रियतेला कारणीभूत ठरत असली तरी अल्पमतातील सरकारे हे प्रमुख कारण न्यायालयीन सक्रियतेचे मानले जात होते. परंतु अशी अनेक उदाहरणे आहेत की, बहुमतातील सरकारे सत्तेत असताना सुद्धा न्यायालयाने आपली सक्रियता कायम ठेवलेली आहे. कायदेमंडळ जेव्हा कमकुवत असते तेव्हा न्यायमंडळ आपले डोके वर काढते. ही म्हण हल्ली कालबाह्य ठरत असताना आढळून येत आहे. उदा. इंदिरा गांधी, राजीव गांधी, अटल बिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी यांची सरकारे प्रचंड बहुमतात असताना सुद्धा न्यायालयाने अनेक वेळा आपली न्यायालयीन सक्रियता दाखवली आहे, अबाधित ठेवली आहे. न्यायालयीन सक्रीयतेच्या संदर्भात न्यायालयावर असाही आरोप होऊ लागला की, न्यायव्यवस्था आपल्या कार्यक्षेत्राबाहेर जाऊन ती अधिकच सक्रिय बनली आहे. मात्र न्यायालयाची ही सक्रियता कधीकधी योग्यच आहे असे म्हणता येईल. कारण सामाजिक आर्थिक व राजकीय जीवनमान ढासळत चाललेले असताना जर न्यायालयाने उदासीनता दाखवली तर कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित होणार नाही. परिणामी अराजकतेसारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे न्यायालय सक्रियता आवश्यक वाटते.मात्र तिची सुद्धा एक सीमा निश्चित असली पाहिजे अन्यथा न्यायपालिकेची अराजकता निर्माण होण्याचा धोका संभावतो आहे. जेव्हा एखाद्या प्रश्नांसंबंधी कायदा स्तब्ध असतो, मौन धारण करतो, त्या प्रश्नासंबंधी घटनेत कसलीच तरतूद नसते, तेव्हा न्यायालयाने न्यायाच्या नैसर्गिक सिद्धांतानुसार तो प्रश्न सोडवावा अशी अपेक्षा केली जाते. तेव्हा न्यायालयाच्या कृतीतून न्यायालयीन सक्रियता निर्माण होते. सध्याच्या राजकीय परिस्थितीत न्यायालयीन सक्रियता योग्य व आवश्यक वाटत असली तरी ती सदा सर्व काळासाठी अनावश्यक आहे. कारण सततच्या सक्रेतेमुळे संसदेच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप वाढत जाऊन सत्ता समतोल ढासळून जाईल तसेच कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ काहीच कार्य करीत नाही असा चुकीचा संदेश जनतेत जाईल. न्यायालयीन सक्रियता नेहमीच निःपक्षपाती असेलच असे सांगता येणार नाही. अशा स्थितीत लोकशाहीचे भवितव्य जनतेच्या नव्हे तर न्यायालयाच्या हातात जाईल. त्यामुळे जनतेने परिस्थिती पाहूनच न्यायालयीन सक्रियतेचे स्वागत केले पाहिजे. जनतेने सतत जागृत राहून योग्य संसद सदस्यांची निवड केल्यास, भ्रष्टाचारापासून दूर राहिल्यास, सामाजिक हिताच्या प्रश्नांना प्रथम प्राधान्य दिल्यास, विनाकारण जनहित याचिका दाखल न केल्यास न्यायालयाच्या सक्रियतेवर हळूहळू मर्यादा येतील. भारताचे माजी मुख्य सरन्यायाधीश पी एन भगवती म्हणतात, ज्या व्यवस्थेमध्ये न्यायालयास पुनर्विलोकनाचा अधिकार तेथे न्यायालयीन सक्रियता असते. पुढे ते असेही म्हणतात की, न्यायालयीन सक्रेतेचे स्वरूप तांत्रिक आणि सामाजिक स्वरूपाचेही असते. गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत अधिकाराच्या दुरुस्तीला विरोध करीत असे निश्चित केले की, कलम 368 मध्ये फक्त घटना दुरुस्तीची प्रक्रिया सांगितली आहे. सर्वोच्च न्यायालयाने पहिल्यांदा आपल्या या निर्णयात न्यायालयीन सक्रियतेचा परिचय दिला.न्यायालय सक्रिय ते बाबत ज्येष्ठ कायदा तज्ञ डॉ. सत्यरंजन साठे म्हणतात, न्यायालयीन सक्रियता ही न्यायालयीन प्रक्रियेचा आवश्यक भाग आहे. ज्यावेळी एखादे न्यायालय कायद्याच्या तरतुदींना बदलत्या परिस्थितीत सातत्य देण्याचा प्रयत्न करते त्यात असणाऱ्या संकल्पना किंवा आशय यांना सजीव करते त्यावेळी ती सक्रियता असते.न्यायालयाच्या न्यायालयीन सक्रियतेला विरोध करताना माकपा पक्षाच्या पॉलीट ब्युरोच्या सदस्या वृंदा कारत म्हणतात की, कायदेमंडळाच्या संबंधित प्रकरणात न्यायपालिकेची दखल वाढत चालली आहे. या संघर्षाने



Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal ISSN : 2278-9308
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- B January, 2023

न्यायालयीन सक्रियता आणि कार्यपालिका यांच्यातील अधिकारांची रेषा अंधुक केली आहे. तर सुरेश द्वादशीवार न्यायालयीन सक्रियता बाबत म्हणतात की, न्यायालयांना अलीकडे लोकप्रियतेचा ही एक मोह जडलेला दिसतो. ते पुढे असेही म्हणतात की, देशात न्यायाधीशांचे सरकार (गव्हर्नमेंट बाय जजेस) आणण्यासारखे वाटते.माजी न्यायमूर्ती छागला म्हणतात, न्यायमूर्तींनी तटस्थता पाळावी ते मला मान्य आहे परंतु त्यांनी स्वतःला समाजापासून अलग मानू नये आपल्या काळाच्या गरजा ओळखण्यात अपयशी ठरलेला खरा न्यायाधीश होऊ शकत नाही. तर न्यायाधीश गजेंद्र गडकरी म्हणतात, आधुनिक लोकशाही राज्यात होणारा मुलग्रही बदल न्यायाधीशांनी विचारात घेतला पाहिजे ज्या सामाजिक जीवनाच्या तत्त्वज्ञानावर लोकशाही कायद्यांची उभारणी होत असते ते तत्त्वज्ञान वकिलांनी आणि न्यायाधीशांनी ओळखले पाहिजे. न्यायाधीशांनी काळाच्या गरजा ओळखल्या पाहिजेत. यावरील अर्थावरून आणि मान्यवरांच्या विधानावरून असे वाटते की जे कायदे मंडळांचे सदस्य आहेत त्यांचा न्यायालयीन सक्रेतेला विरोध आहे. तर जे कोणी न्यायाधीश आहेत ते कमी अधिक प्रमाणात न्यायालयीन सक्रियतेचे समर्थन करताना आढळतात. कधीकधी न्यायालयावर या सक्रियतेबाबत टीका करताना असेही म्हटले जाते की, भारतीय न्यायव्यवस्था अपेक्षित परिणाम देण्यात अपयशी ठरली आहे. न्यायव्यवस्था स्वतःच्या क्षेत्रात जास्त सक्रियता दाखवत नाही हे यावरून स्पष्ट होते. न्यायालयीन सक्रियता केवळ राजकीय क्षेत्रापूर्ती किंवा मूलभूत अधिकारासंबंधी मर्यादित राहिली नसून, ही सक्रियता सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक अशा अनेक क्षेत्रात हळूहळू पाहावयास मिळत आहे.

न्यायालयीन सक्रियतेच्या विकासात एका पोस्ट कार्डला हेबिअस् कॉर्पस रिट समजून त्यात आदेश दिले गेले. हा सर्वात मोठा धाडसी निर्णय मानला जातो. आज न्यायालयीन सक्रियता स्वयंप्रेरणेने दखल घेऊनं संबंधित पक्षाला नोटीस पाठवत आहे एवढे व्यापक क्षेत्र न्यायालयीन सक्रियतेचे बनले आहे. न्यायालय सक्रियते बाबत इंग्लंडचे मुख्य न्यायाधीश कोक म्हणतात की, न्यायालयाचे कार्य आणि अधिकार हे केवळ सर्व तऱ्हेच्या प्रशासनातील चुका दुरुस्त करण्याचे नाही तर भविष्यात कोणतीही चूक व गैरप्रकार खासगी अथवा सार्वजनिक होणार नाही हे पाहण्याचे आहे. लोकशाही स्वीकारलेल्या राष्ट्रांच्या इतिहासात न्यायालयीन साक्रियतेचा संघर्ष हा न्यायालयाच्या स्थापनेपासूनच पाहावयास मिळतो. सन 1608 मध्ये ब्रिटनमध्ये कोकने बोनहम खटला, अमेरिकेत 1803 मध्ये मार्वरी विरुद्ध मेडिसिन खटला, भारत 1950 मध्ये रमेश थापर विरुद्ध मद्रास राज्य व 1951 मध्ये श्रीनिवास विरुद्ध मद्रास राज्य या खटल्यांच्या माध्यमातून न्यायालयीन सक्रियतेला प्रारंभ केला. हा प्रारंभ करत असताना कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ यांच्याबरोबर न्यायव्यवस्थेचा संघर्ष सुरू झालेला आढळतो.

कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांना न्यायालयीन सक्रियता नकोशी वाटते. याचे प्रमुख कारण म्हणजे न्यायालयीन सक्रेतेमुळे आपले अधिकार नष्ट होतील अशी भीती त्यांना वाटत असते. असे असले तरी घटनेत अनेक आदर्श स्वीकारण्यात आलेले असतात ते प्रस्थापित करणे हे न्यायालयाचे सुद्धा कर्तव्य असते. त्यामुळे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आपल्या लोककल्याणकारी कार्यापासून जेव्हा विचलित होते तेव्हा न्यायालयांनी आपली सक्रियता दाखवलेली आढळते. परंतु कधी कधी ही न्यायालय सक्रियता ध्येय धोरणातील अडथळा मानली जाते. कारण राजकारण्यांना मतावर डोळा ठेवून कार्य करायचे असते तर न्यायालयाला नियमावर बोट ठेवून कार्य होते की नाही हे पाहायचे असते. त्यामुळे भारताच्या एका विशिष्ट कालखंडात संसद विरुद्ध न्यायालय हा संघर्ष मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळतो. आजही तो कमी अधिक प्रमाणात असलेला आढळून येतो. अलीकडचेच उदाहरण द्यावयाचे ठरले तर सोळावी लोकसभा अस्तित्वात आल्यानंतर एनडीए सरकारने म्हणजेच नरेंद्र मोदी सरकारने राष्ट्रीय नियुक्ती आयोग NJAC हे 99 वे घटना दुरुस्ती विधेयक संसदेत मांडले. त्याला दोन्ही

Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516

सभागृहांनी दोन तृतीयांश बहुमताने संमत केले. या विधेयकाला राष्ट्रपतींनी 31 डिसेंबर 2014 मध्ये संमतीदर्शक सही दिली. परंतु काही दिवसातच या कायद्याला अनेक याचिकांच्या माध्यमातून न्यायालयात आव्हान देण्यात आले. दोन्ही बाजूने युक्तिवाद होऊन 16 ऑक्टोबर 2015 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने 99 वे घटना दुरुस्ती विधेयक व राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग रद्द केला. याचाच अर्थ असा होतो की, न्यायालय आणि संसद यांच्यातील हा सत्ता संघर्ष संपलेला नाही. न्यायाधीशांच्या नेमणुकांचे अधिकार पुन्हा सरकार आपल्या हातात घेऊ पाहत होते याला न्यायालयाने विरोध करताना सक्रियता दाखवत 99 वी घटना दुरुस्तीच रद्द करून टाकली. भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला असला तरी कधी कधी भारतात असा अनुभव येतो की, लोकांची लोकशाही ही न्यायालयाच्या लोकशाहीत रूपांतरित झाली की काय असे वाटते. न्यायालय आणि शासन या दोन संस्थातील वाद भारतीय लोकशाहीला हानिकारक आहे असे अनेक लोकांना वाटत असले तरी त्याबाबत न्यायमूर्ती सब्ररवार म्हणतात, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ या दोन स्तंभांमध्ये फार जिव्हाळ्याचे संबंध असायला नको वाटतात. या दोघांमध्ये फार जवळचे संबंध असणे धोकादायक वाटतंय कारण हे संबंध स्वतंत्रपणे निर्णय घेण्याच्या मार्गातील अडसर ठरू शकतात. परंतु या दोघांमध्ये सामंजस्याचे वा सौदाहारेपूर्ण संबंध मात्र असायला हवे असे म्हटले. लोकशाहीत सक्रियता वाढणे चांगले नसून ते न्यायालयीन हुकूमशाहीला एक प्रकारे निमंत्रण असले तरी जेव्हा लोकशाहीचे मार्ग बंद होतात आणि जनमताचाही उपयोग होत नाही,तेव्हा तेव्हा व्यक्ती व माणसाचे मूल्य आजवर फक्त न्यायालयानेच सांभाळले आहे हे निदर्शनाला येते. लोकशाही मूल्यांची पायमल्ली अनेक वेळा विविध विभागाकडून झालेली आढळते. त्यामुळे एका बाजूने मूल्य पायदळी तुडवायची आणि त्याबाबत न्यायालयाने जाब विचारताच न्यायालयाने देश चालविण्याचे काम करू नये असे म्हणायचे, अशी एक नवीन कार्यपद्धती सुरू झालेली आढळते. म्हणून ज्या ज्या वेळी मूल्य, अधिकार पायदळी तुडवले जातात त्या त्या वेळी त्यांची जोपासना करण्याचे काम न्यायालयाचे असते म्हणूनच भारतात लोकशाही मूल्य रुजवण्याकरिता ही सक्रियता उपयुक्त ठरलेली आहे. डॉ. बी आर आंबेडकर यांनी न्यायालयाच्या सक्रियतेला विरोध करतानाच संसदेच्या सुद्धा कार्यपद्धतीवर अविश्वास व्यक्त केला होता ते म्हणाले होते की, मी संभ्रमात आहे चार-पाच न्यायाधीशांनी कायद्याच्या योग्यतेबाबत निर्णय घेणे धोक्याचे आहे पण पक्षीय अभिनिवेशाने कायदेमंडळातील बहुमत लोकशाही नीती विरुद्ध वागणारच नाही याची खात्री देता येत नाही. या त्यांच्या मताचा भारतीयांना अनेक वेळा अनुभव आलेला आहे. बहुमताच्या जोरावर सरकारने अनेक वेळा जनतेच्या इच्छेविरुद्ध निर्णय घेतलेले आहेत. त्यामुळे लोकांना सरकारच्या विरुद्ध सक्रियता दाखवून सरकारला काही कायदे मागे घेण्यास भाग पाडलेले आढळते. हल्लीचे उत्तम उदाहरण म्हणजे शेतीसंबंधी केलेले तीन कायदे, पंजाब मधून सुरू झालेल्या आंदोलनामुळे सरकारला ते मागे घ्यावे लागले. तर काही निर्णयांमध्ये न्यायालयाचा अपेक्षित निर्णय येण्याऐवजी तो लोक मताच्या विरोधात गेल्याचे दिसून येत आहे. उदा. नोट बंदी संबंधीचा निकाल. लोकशाही मधील न्यायालयीन सक्रियतेच्या भूमिकेप्रमाणेच जनहित याचिका माध्यमातून न्यायालयाने खूप मोठ्या प्रमाणात सक्रियता दाखवून सक्रियतेला एक नवी ओळख करून देण्याचे काम केले. भारतात जनहित याचिकांचा प्रारंभ कधी झाला याबाबत काहीसे मतभेद असले तरी न्यायमूर्ती पी एन भगवती यांच्या काळापासूनच जनहित याचिकांच्या युगाचा प्रारंभ झाला असे मानले जाते. भारतीय संविधानात जनहित याचिकांचा उल्लेख कोठेच दिसून येत नाही मात्र जनहित याचिका न्यायालयीन सक्रियतेचे मुख्य माध्यम बनले आहे. घटनेतील कलम 226 व 32 च्या माध्यमातून जनहित याचिका समोर येत आहेत. इंग्लंड अमेरिका यासारख्या देशात जनहित याचिकांना महत्त्वाचे स्थान आहे. भारतात जनहित याचिकाचे लोण थोडे उशिरा म्हणजे 1976 मध्ये तिची बीजे पेरली गेली. जनहितवाद या शब्दाचा प्रयोग सर्वप्रथम न्यायमूर्ती कृष्ण अय्यर व न्यायमूर्ती पी एन भगवती



Scanned with OKEN Scanner

यांच्याद्वारे केला गेला. हा उल्लेख त्यांनी एस.पी. गुप्ता विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या या खटल्यात केला. या जनहित याचिकांचा एक प्रकारे महापूर न्यायालय मध्ये आलेला आहे. त्यामुळे आता कोणत्या जनहित स्वीकारावयाच्या याबाबतीत न्यायालयाला आपले धोरण ठरवावे लागत आहे. न्यायालय सक्रियता लोकशाहीसाठी योग्य वाटत असली आणि जनहित याचिकांच्या माध्यमातून ही सक्रियता वाढत असली तरी ही सक्रियता पुरोगामी असेलच असे नाही. कारण कधी कधी न्यायालय सक्रियता ही प्रतिगामी स्वरूपाची सुद्धा आढळत आहे. आपल्या आवडीचे आणि सोयीचे विषय जनहित याचिका म्हणून दाखल करून घ्यायचे आणि अडचणीचे ठरणारे विषय, जनहित याचिका कार्यकर्त्याला दंड करून नाकारवयाचे असे अनेक प्रकार न्यायालयीन सक्रियतेच्या बाबतीत घडत असताना आढळून येतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्या धार्मिक ग्रंथात विषमतेची धुळवट केलेली आहे. अशा मनुस्मृतीचा जनक मनु याचा पुतळा 28 जून 1989 मध्ये जयपूरच्या हायकोर्टाच्या अंगणात उभा केलेला आहे. त्याला कुठल्याही परवानगीची कशी गरज वाटली नाही. फाशीची शिक्षा ही बहुजनांसाठीच आहे . असाही एक आक्षेप न्यायालयावर घेतला जातो. कारण आत्तापर्यंत अपवादात्मक सवर्णांना फाशी लटकवले आहे असे आढळून येते. 50% पेक्षा जास्त आरक्षण ठेवता येणार नाही असा दिलेला निर्णय सुद्धा हा न्यायालयाची प्रतिगामी सक्रियताच मानली जाते. अहमदनगर जिल्ह्यातील चिचोंडी पाटील या गावातील भिल्ल महिलेच्या संदर्भातील निकाल हा सुद्धा प्रतिगामी सक्रियताच म्हणता येईल, या निकालात 92 टक्के भारतीयांना बाहेरचे ठरवले आहे, परकीय ठरवले आहे, त्यांना स्थलांतरित ठरवले आहे. ओरिसा राज्यात केंद्र पाडा जिल्ह्यात कोरे दगड गावात चालू असलेली प्रथा बंद पाडण्यासाठी अनेक याचिका दाखल करण्यात आल्या परंतु ती प्रथा बंद करण्याचा आदेश न्यायालयाने दिले नाहीत. कारण या प्रथेत उच्चवर्णीयांचे हितसंबंध जोपासले जातात.

भ्रष्टाचार हा भारतीय संस्कृतीला लागलेला मोठा कलंक आहे ज्याप्रमाणे कायदेमंडळ कार्यकारी मंडळ या शाखा भ्रष्टाचारापासून अलिप्त राहू शकल्या नाहीत तसेच न्यायालय देखील भ्रष्टाचारापासून अलिप्त राहू शकले नाही. न्यायालयाने भ्रष्टाचारात देखील एक प्रकारे सक्रियता दाखवलेली आढळते. न्यायालयीन भ्रष्टाचाराची प्रकरणे सहसा उघडकीला येत नाहीत, उघडकीला आलीच तर ती दबक्या आवाजात येतात त्यावर फारशी चर्चा होत नाही. या विभागात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे घडत असतात परंतु ती संपुष्टात आणण्यासाठी न्यायालयाकडून कधी सक्रियता दाखवली जात नाही. भारतातील न्यायाधीशांचे भ्रष्टाचाराचे प्रमाण धक्कादायक आहे ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल या खाजगी संस्थेने केलेल्या पाहणीनुसार भारतात 63% न्यायाधीश भ्रष्ट आहेत असे म्हटले आहे. पंजाब हरियाणा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी पार्सल द्वारे पैसे घेतल्याचे प्रकरण सर्वत्र चर्चेत आहे. हे प्रकरण कॅश बाय कुरिअर या नावाने प्रसिद्ध आहे. असे म्हटले जाते की भ्रष्ट लोकशाहीला स्वच्छ न्यायालय वाचविता ज्या देशात न्यायालय भ्रष्ट असतात तेथील लोकशाहीला कोणी वाचवायचे असते असा प्रश्न निर्माण होतो. न्यायालयीन भ्रष्टाचाराची प्रकरणं आजही माजी राजकारणी, निवृत्त न्यायाधीश यांच्या लिखाणातून आत्मचरित्रातून ती वाचावयास मिळतात. न्यायालयीन भ्रष्टाचाराबाबत कॉम्रेड ?. अजित अभ्यंकर म्हणतात, सर्वसामान्यांचा विश्वास न्याय यंत्रणेवर आहे आता तो कमी कमी होत आहे. सामान्यांना न्याय मिळेल असा भरवसा वाटत नाही सर्वोच्च न्यायालयापासून तालुका न्यायालयापर्यंत न्यायदानाची पद्धत किचकट क्लिष्ट आणि श्रीमंत धार्जीनी होत आहे. पैसे असेल तर न्याय मिळेल असा सध्याचा प्रकार दिसतो. तर भारताचे एक माजी सरन्यायाधीश म्हणतात 15% न्यायव्यवस्था ही देखील भ्रष्ट आहे. अशी भ्रष्टाचाराची प्रकरणे पाहून त्यावेळी न्यायमूर्ती बी एन खरे यांनी असे म्हटले होते की, भ्रष्ट न्यायाधीशावर कारवाईचे अधिकार सरन्यायाधीशांना हवेत. या विधानावरून न्यायालय भ्रष्टाचारातही सक्रिय असल्याचे आढळून



Scanned with OKEN Scanner

येते. भ्रष्टाचारामुळे न्यायमूर्ती रामास्वामी, न्यायमूर्ती पि डी दिनकर, न्यायमूर्ती सौमित्र सेन यांच्यावर महाभियोगाचे खटले भरण्यात आले होते. परंतु ते यशस्वी होऊ शकले नाहीत.

न्यायालयीन सक्रियता ही न्यायालयाच्या आवडीचा विषय असला तरी ती कायदेमंडळ कार्यकारी मंडळ यांना न आवडणारी आहे. परंतु या कार्यकारी कायदेमंडळ म्हणजेच संसदेचे स्वरूपही तपासून पाहिले पाहिजे. न्यायालयीन सक्रियतेला विरोध करणारे जे कायदेमंडळ आहे त्याचे गुन्हेगारीचे स्वरूप जर पाहिले तर ते प्रचंड आढळून येते. एवढेच नाही तर त्यांची कामाप्रती निष्क्रियता सुद्धा मोठ्या प्रमाणात आढळते. जसे की 2008 मध्ये संसदेमध्ये बारा मिनिटात सतरा विधेयके मंजूर झाली. तर 2004 ते 2009 या कालखंडात लोकसभा व राज्यसभा मिळून फक्त 190 खासदार बोलले 30 नंबर 2009 मध्ये 28 संसद सदस्य गैरहजर होते की ज्यांनी तारांकित प्रश्न विचारले होते. चौदाव्या लोकसभेत 545 खासदारांपैकी 29 खासदारांवर स्त्रियांचा छळ केल्याचा आरोप होता. 07 खासदारांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक झाली होती. तर 71 खासदारांकडे कर्ज मिळवण्यासाठी लागणारी पत सुद्धा नव्हती. 84 खासदारांना वेगवेगळ्या खटल्यांमध्ये शिक्षा होऊन दंडही भरलेला आहे. म्हणजेच 545 पैकी 268 खासदारांवर कोणत्या ना कोणत्या प्रकरणात दोषारोप आहेत. हल्ली एवढे बहुमत सुद्धा कोणत्याही राजकीय पक्षाला लवकर प्राप्त करता येत नाही एवढी गुन्हेगारांची संख्या सभागृहात पाहावयास मिळते आणि हेच लोक न्यायालयीन सक्रियतेला विरोध करतात. अशा गुन्हेगारी राजकारणाच्या प्रवृत्ती वरून जनतेच्या विकासाची कोणती अपेक्षा करावी हा प्रश्न पडतो. त्यामुळे जनतेला शेवटचा आशेचा किरण म्हणून न्यायालय आणि न्यायालयाची सक्रियता विश्वासू वाटतेय.

निष्कर्ष

- न्यायालय सक्रियता भारतात प्रारंभ पासूनच आढळते.
- न्यायालयीन सक्रेतेमुळे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ यांच्या कार्यावर नियंत्रित प्रस्थापित होताना आढळते.
- न्यायालयीन सक्रियतेस कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, प्रशासन यांची कार्यपद्धती कारणीभूत ठरत आहे, यांची उदासीनता न्यायालयीन सक्रियतेला कारण ठरत आहे.
- न्यायालय सक्रियता लोकांना चांगली वाटत असली तरी ती कायमस्वरूपी असावी या पक्षाचे कोणीच आढळत नाही.
- न्यायालय सक्रियतेमुळे संसद आणि न्याय मंडळ यांच्या संघर्षात वाढ झाली आहे.
- न्यायालय सक्रिय मुळे नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे व संविधानाचे संरक्षण झाले आहे हे मान्य करावे लागते.
- न्यायालय सक्रियतेमुळे लोकशाही मूल्यांची जोपासणूक झाली आहे.
- न्यायालय सक्रियतेचे जनहित याचिका हे प्रमुख माध्यम बनले आहे.
- न्यायालय सक्रियता जशी पुरोगामी आहे तशी ती प्रतिगामी सुद्धा आहे.
- न्यायालयाची सक्रियता भ्रष्टाचारात सुद्धा पाहावयास मिळते न्यायालयीन भ्रष्टाचारात प्रचंड वाढ झाली आहे.

संदर्भ..

1. बाचल वि. मा., भारतीय न्यायव्यवस्थेची सक्रियता, मासिक सत्याग्रही विचारधारा, पुणे
2. निर्मलकुमार सिंह, अपराधा और भ्रष्टाचार की राजनीती, वाणी प्रकाशन दिल्ली.
3. डॉ. भनोत वेला, भारत मे न्याय प्रशासन; पॉइंटर पब्लिशर्स, जयपुर .
4. चपळगावकर नरेंद्र, विधिमंडळे आणि न्यायसंस्था, मौज प्रकाशन, मुंबई.
5. नाटाणी प्रकाश नारायण, भारत मे न्यायपालिका, अविष्कार पब्लिशर्स जयपुर.
6. शिंत्रे वि .पु., जनहित याचिका, राजहंस प्रकाशन, पुणे.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner